जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 FEB 2023

पुढारी

# डॉ. यशवंतराव थोरात यांचे लेखन व्यापक मूल्यशिक्षणाचा वस्तुपाठ

## मराठी राजभाषा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील ग्रंथ चर्चेतील सूर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ तथा विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांचे लेखन हा व्यापक मूल्यशिक्षणाचा वस्तुपाठ आहे, असा सूर ग्रंथ चर्चेत उमटला.

डॉ. थोरात यांच्या 'काही वाटा, काही वळणं' आणि 'नवी वाट, नवे क्षितिज' या दोन पुस्तकांचे नुकतेच प्रकाशन झाले. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात पुस्तकांच्या अनुषंगाने विशेष ग्रंथचर्चा आयोजन केले होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी डॉ. यशवंतराव थोरात, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. उषा थोरात, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, मराठी साहित्यामध्ये स्व-केंद्री, मध्यमवर्गी अनुभवकथनात ललितलेखन गुरफटले आहे. या पार्श्वभूमीवर मराठी ललित लेखनाच्या क्षेत्रात डॉ. थोरात यांचे मुक्त, वैश्विक वाचनानुभव देणारे लेखन वेगळे ठरते. डॉ. रघुनाथ कडाकणे म्हणाले, भारताचे संविधान ज्या व्यक्तीला गोष्टीरुपात वाचावयाचे असेल त्यांनी डॉ. थोरात यांची पुस्तके वाचावीत. त्यांच्या समग्र व्यासंगाचे दर्शन त्यांच्या लेखनातून घडते.



**कोल्हापूर : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित ग्रंथदिंडीचे उद्घाटन पालखी पूजनाने करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. यशवंतराव थोरात, डॉ. उषा थोरात, डॉ. धनंजय सुतार, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.**

डॉ. थोरात म्हणाले, देशातील विविधता ही ताकद आहे; पण आपापसातली भेदभावाची भावना दूर लोटायला हवी. भारतीयत्वाचा विसर कधीही पडू देता कामा नये. हृदय आभाळाएवढे विशाल करा, विवेकी व्हा, विचार करा आणि देशाच्या प्रगतीची दिशा निश्चित करा, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आपल्या प्रचंड अनुभव संचिताची मांडणी सहज संवादी भाषेत कशी करावयाची हे डॉ. थोरात यांच्या लेखनातून समजते. अनेक दुर्मीळ संदर्भ त्यांच्या लेखांमध्ये आढळतात. त्यामुळे त्यांच्या लेखनाला साहित्य मूल्याबरोबरच संदर्भमूल्य प्राप्त आहे.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले. दुसऱ्या सत्रात अरुण कोलटकर लिखित 'भिजकी वही' या कवितासंग्रहाचे नाट्यात्मक सादरीकरण जळगाव येथील परिवर्तन चमूर्फे करण्यात आले.

## 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या गजरात ग्रंथदिंडी

मराठी अधिविभाग व डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने विद्यापीठ परिसरामध्ये 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या गजरात ग्रंथदिंडी काढली. त्यांना हुपरीच्या वारकऱ्यांची साथसंगत लाभली. दिंडीतील पालखीमध्ये श्री ज्ञानेश्वरीसह तुकारामांची गाथा, नामदेवांची गाथा यासह भारतीय संविधान ठेवण्यात आले होते. विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारात कुलगुरू यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर दिंडीस सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून दिंडीचे वि. स. खांडेकर भाषा भवन येथे आल्यानंतर विसर्जन करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 FEB 2023
सकाळ

# थोरातांचे लेखन मूल्यशिक्षणाचा वस्तुपाठ

## ग्रंथ चर्चेतील सूर; शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा दिनानिमित्त आयोजन

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात शब्दांचे उत्तम कारागीर असून, त्यांचे लेखन व्यापक मूल्यशिक्षणाचा वस्तुपाठ आहेत, असा सूर शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित ग्रंथचर्चेत आज उमटला. डॉ. थोरात यांच्या 'काही वाटा, काही वळणं' आणि 'नवी वाट नवे क्षितिज' पुस्तकांचे नुकतेच प्रकाशन झाले. दोन्ही पुस्तकांच्या अनुषंगाने विशेष ग्रंथचर्चा झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. वि. स. खांडेकर सभागृहात कार्यक्रम झाला.



कोल्हापूर : मराठी भाषा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित ग्रंथचर्चेत डॉ. यशवंतराव थोरात यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. डावीकडून डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. विलास शिंदे, डॉ. उषा थोरात, डॉ. रघुनाथ कडाकणे.

डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, ''मराठी साहित्यात स्वकेंद्री, मध्यमवर्गीय अनुभव कथनात ललित लेखन गुरफटले आहे. या पार्श्वभूमीवर मराठी ललित लेखनाच्या क्षेत्रात डॉ. थोरात यांचे मुक्त, वैश्विक वाचनानुभव देणारे लेखन वेगळे ठरते. त्यांचा अनुभव संचय दांडगा असून मांडण्याची शैली त्यांच्या लेखनाला वेगळे वैशिष्ट्य देते. त्यांचा अनुभव व सादरीकरणाच्या कक्षा अत्यंत विस्तृत स्वरुपाच्या आहेत. स्वतःकडे न्यूनत्व घेऊन बहुकेंद्री व समाजकेंद्री लेखनाकडे त्यांचा कल आहे. व्यापक सामाजिक बांधिलकी, जगण्याविषयीची शहाणीव, सामाजिक-आर्थिक विषमता निर्मूलनासाठी आग्रह, नैतिकता व बुद्धिमत्ता यांचा आपसमेळ आणि मानव व समतेची पूजा म्हणजेच धर्म याची जाणीव पेरणी करीत माणूसपणाचे अधोरेखन डॉ. थोरात लेखनातून करतात.'

डॉ. रघुनाथ कडाकणे म्हणाले, ''डॉ. थोरात सुप्त अनुवादकाचे जन्मदाते आहेत. भारताचे संविधान ज्या व्यक्तीला गोष्टीरुपात वाचायचे असेल, त्याने त्यांची पुस्तके वाचावीत. अविश्रांत अभ्यासातून त्यांनी त्यांचे व्यासंगी व्यक्तिमत्त्व घडविले आहे. त्यांच्या समग्र व्यासंगाचे दर्शन त्यांच्या लेखनातून घडते. अर्थशास्त्रासह, नीतीशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, ऊर्दू कविता, काव्यशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास अशा अनेकविध विषयांचा त्यांचा व्यासंग स्तिमित करणारा आहे.''

डॉ. थोरात म्हणाले, ''मी सुरुवातीपासून माझ्या कुठल्याही लेखात उपदेश न देण्याचा निर्धार केला. मध्यममार्ग मला प्रिय आहे. टोकाची भूमिका घेणे मला योग्य वाटत नाही. सत्याचे सर्व पैलू चिकित्सापूर्वक लक्षात घेऊन लेखन करण्याकडे माझा कल असतो. सत्याच्या पावित्र्यावर माझा सदैव विश्वास आहे. देशातील विविधता ही आपली ताकद आहे. आपापसातली भेदभावाची भावना आपल्याला दूर लोटायला हवी. आपल्या भारतीयत्वाचा विसर आपण कधीही पडू देता कामा नये.'' या वेळी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. उषा थोरात व प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

### 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या गजरात ग्रंथदिंडी उत्साहात

▪ मराठी अधिविभाग व डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मराठी भाषा दिनानिमित्त विद्यापीठ परिसरात 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या गजरात ग्रंथदिंडी काढली. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते पालखीचे पूजन झाले. दिंडीत हुपरीच्या अनुभवी वारकऱ्यांचा सहभाग होता. दिंडीत ज्ञानेश्वरीसह तुकारामांची गाथा, भारतीय संविधान ठेवण्यात आले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 FEB 2023
तरूण भारत

# डॉ. थोरात यांचे लिखाण मुक्त आणि वैश्विक

## मराठी राजभाषा दिनानिमित्त विद्यापीठातील आयोजित ग्रंथ चर्चेत मान्यवरांचा सूर

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

मराठी साहित्यामध्ये स्वकेंद्री, मध्यमवर्गी अनुभव कथनात ललितलेखन गुरफटलेले आहे. मराठी ललितलेखनाच्या क्षेत्रात डॉ. थोरात यांचे लेखन मुक्त, वैश्विक वाचनानुभव देणारे आहे, असा सूर मराठी राजभाषा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील आयोजित ग्रंथ चर्चेत मान्यवरांचा होता. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ तथा विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांच्या 'काही वाटा, काही वळणं' आणि 'नवी वाट नवे क्षितीज' या पुस्तक लेखनावर चर्चा झाली.

वि. स. खांडेकर सभागृहात आयोजन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. यावेळी नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात, डॉ. उषा थोरात, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, डॉ. थोरात यांचा अनुभवसंचय आणि मांडण्याची शैली ही त्यांच्या लेखनाला वेगळे वैशिष्ट्य प्रदान करते. बहुकेंद्री व समाजकेंद्री लेखनाकडे त्यांचा कल आहे. संविधानाप्रती अविचल निष्ठा आणि मानवतेविषयीचे चिंतन त्यांच्या लेखनातून व्यक्त होते. डॉ. रघुनाथ कडाकणे म्हणाले, डॉ. थोरात यांच्या लिखानात भारताचे संविधान गोष्टीरुपात आहे. अविश्रांत अभ्यासातून त्यांनी त्यांचे व्यासंगी व्यक्तिमत्त्व घडविले आहे. अर्थशास्त्रासह, नीतीशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, ऊर्दू कविता, काव्यशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास अशा अनेकविध विषयांचा त्यांचा व्यासंग स्तिमित करणारा आहे.



कोल्हापूर : मराठी राजभाषा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यक्रमात अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. विलास शिंदे, डॉ. उषा थोरात, डॉ. रघुनाथ कडाकणे.

डॉ. यशवंतराव थोरात म्हणाले, मी सुरवातीपासूनच माझ्या कुठल्याही लेखात उपदेश देत नाही. सत्याचे सर्व पैलू चिकित्सापूर्वक लक्षात घेऊन लेखन करण्याकडे माझा कल असतो. सत्याच्या पावित्र्यावर माझा सदैव विश्वास आहे. आपल्या देशातील विविधता आपली ताकद आहे, पण आपापसातली भेदभावाची भावना दूर लोटायला हवी. आपल्या भारतीयत्वाचा विसर पडू न देता विवेकी विचारांत देशाच्या प्रगतीची दिशा निश्चित करावी, असा सल्ला त्यांनी दिला.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, प्रचंड अनुभव संचिताची मांडणी सहज संवादी भाषेत कशी करावयाची हे डॉ. थोरात यांच्या लेखनातून समजते. अनेक दुर्मीळ संदर्भ त्यांच्या लेखनात आढळतात. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

अरूण कोलटकर लिखित 'भिजकी वही' या कवितासंग्रहाचे नाट्यात्मक सादरीकरण जळगाव येथील परिवर्तन संघातर्फे करण्यात आले. मराठी विभाग आणि डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनच्या वतीने विद्यापीठ परिसरात 'ज्ञानोबा–तुकोबा'च्या गजरात ग्रंथदिंडी उत्साहात पार पडली. पालखीमध्ये ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा, नामदेवाची गाथा, भारतीय संविधान ठेवण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याला अभिवादन करून ग्रंथदिंडीला सुरुवात झाली. वि. स. खांडेकर भाषा भवन येथे दिंडीचे विसर्जन करण्यात आले.

पुढारी

# विद्यापीठात आज राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त पुस्तक प्रदर्शन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त मंगळवारी (दि. २८) सकाळी १०.३० वाजता बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रातील मुख्य प्रवेशद्वारात 'ग्लोबल सायन्स फॉर ग्लोबल वेलबिईंग' या विषयावरील पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. प्रदर्शनाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. तरी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थ्यांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्र प्रभारी संचालकांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागात आज वैज्ञानिक प्रतिकृती, उपकरणांची मांडणी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त (दि.२८) सकाळी १० ते दुपारी २.३० पर्यंत पर्यावरणशास्त्र अधिविभागात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध वैज्ञानिक प्रतिकृती व उपकरणांची मांडणी केली जाणार आहे. विज्ञान क्षेत्रात भरीव कामगिरी केलेल्या ऑस्ट्रेलिया व स्वित्झलँड येथील शास्त्रज्ञांची व्याख्याने ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. अधिविभागातील प्रयोगशाळा शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि नागरिकांसाठी खुली राहणार आहे. तरी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

2 8 FEB 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा समाजोपयोगी संशोधनावर भर!

## आजारापासून ते प्रदूषण नियंत्रणावर उपाय शोधण्याचे प्रयत्न

कोल्हापूर : प्रवीण मस्के

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागामध्ये आजारापासून ते प्रदूषित सांडपाण्यावरील प्रक्रिया, हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या समस्या, पर्यावरण, जलनियोजन, जलप्रदूषण, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण विषयावरील संशोधनावर भर दिला जात आहे. येणाऱ्या काळात याचा समाजासाठी मोठा उपयोग होणार आहे.

चंद्रशेखर वेंकट रामन यांच्या स्मरणार्थ दरवर्षी २८ फेब्रुवारी राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षीची 'ग्लोबल सायन्स फॉर ग्लोबल वेलबीईंग' थीम असणार आहे.

रसायनशास्त्र अधिविभागात प्रदूषित सांडपाण्यावरील प्रक्रिया, सौर ऊर्जेचा उपयोग करून पाण्यापासून इंधन (हायड्रोजन) निर्मिती, सोडियम आयन बॅटरी, पर्यावरणपूरक व जास्त काळ टिकणारे पेंट निर्मिती, कॅन्सरवर प्रभावी ठरतील अशी नवरासायने, औद्योगिक सांडपाण्याच्या पृथ्थकरणासाठी वेगवेगळ्या पद्धतींवर प्रभावी व सखोल संशोधन सुरू आहे. त्याद्वारे मानवी जीवन सुसह्य करण्यासाठी संशोधक परिश्रम घेत आहेत.



राष्ट्रीय विज्ञान दिन विशेष...

प्राणीशास्त्र विभागात १९६४ पासून 'हिस्टोकेमेस्ट्री' या संशोधन विषयात जागतिक पातळीवर संशोधन नावारूपाला आले आहे. शरीरातील विविध पेशींत तयार होणारी जीवरसायने व शरीरक्रिया व आजारपणानुसार होणारे बदल अधिभागात अभ्यासले जात आहेत. विभागाने ॲनिमल सेल क्लचर लॅबची निर्मिती केली आहे. तसेच जतन केलेल्या प्राण्यांचे म्युझियम व मान्यताप्राप्त प्राणी संगोपनगृह आहे. फुलपाखरांचे पार्क असून जीवनचक्रासाठी ८० प्रकारच्या वनस्पती व ४० प्रकाराची फुलपाखरे आहेत.

### 'पार्किन्सन्स' व 'अल्झायमर' रोगावर ठोस औषधे मिळणार?

बायोटेक्नॉलॉजी विभागात मज्जासंस्थेशी संबंधित 'पार्किन्सन्स'या आजाराच्या अभ्यासासाठी 'म्युकुना' ही वनस्पती वापरली जाते. विभागात १६ प्रकारच्या 'म्युकुना' च्या प्रजातीवर अभ्यास सुरू आहे. या प्रजातीमध्ये 'एल-डोपा' हा महत्त्वाचा बायोॲक्टिव्ह कंपाऊंड असून त्यामुळे पार्किन्सन्स कमी होण्यास मदत होते. अल्झायमर हा मेंदूंचा आजार असून यामुळे विस्मरण व स्मरणशक्ती नष्ट होते. 'ग्लँटामाईन' बाजारात अल्झायमरच्या उपचारासाठी वापरला जातो. बायोटेक्नॉलॉजी विभागात 'पॅनक्राट्युम' प्रजातीमध्ये महत्त्वाचा घटक आहे. वनस्पतीतून दोन्ही आजारांवर ठोस औषध शोधण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

भूगोल अधिविभागात भूमी उपयोजन, मृदा संवर्धन, पाणी समस्या व नदी खोरे व्यवस्थापन, हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या समस्या, पर्यावरण जलनियोजन, नागरीकरण व दळण-वळण या क्षेत्रात प्रामुख्याने भूमापन व इतर संशोधन पद्धती जिओइन्फॉरमॅटिक्स व सुंदर संवेदनाच्या सहाय्याने संशोधन सुरू आहे. उद्योगधंदे विकासातील प्रश्न व पर्यटन नियोजन, विकास यावर देखील समाजपयोगी संशोधन सुरू आहे.

पर्यावरणशास्त्र विभागात नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व संवर्धन करून शाश्वत विकासाचे ध्येय लक्षात घेऊन विविध प्रकारचे संशोधन सुरू आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेले हवा प्रदूषण मापन यंत्र सुरू आहे. याच्या माध्यमातून शहरातील हवेच्या गुणवत्तेचे मोजमाप केले जात आहे. साखर कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या ऊस मळीचे खतात रूपांतर करण्याबाबतचे संशोधन सुरू आहे. कमी खर्चात पिण्याच्या पाण्याचे शुद्धीकरण करता येईल, ही पद्धतीवर संशोधन केले जात आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या १५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या १५ अभ्यासक्रमांचे निकाल सोमवारी लागले. आजअखेर एकूण १२२ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ रुरल स्टडीज, मास्टर ऑफ सायन्स या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने सोमवारी विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी एकूण ९७ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, या परीक्षेसाठी विद्यापीठाच्या भरारी पथकाने दिवसभरात कोल्हापूर जिल्ह्यातून ३ गैरप्रकार उघडकीस आणले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंग जाधव यांनी दिली.

पुढारी

# १२२ पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा अंतर्गत आजअखेर परीक्षा विभागाने १२२ पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले आहेत. विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे आहेत. सोमवारी विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागात झाल्या. दरम्यान, आजअखेर सुमारे १२२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. यात मास्टर ऑफ जर्नालिझम, एमसीए, फिजिकल केमेस्ट्री, एमएससी (बॉटनी), एम.एस्सी. (फूड सायन्स), शुगर टेक्नॉलॉजी आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

तरूण भारत



# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत १२२ विषयांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत हिवाळी सत्रातील परीक्षा अंतिम सत्रात आहेत. सोमवारी झालेल्या विविध विषयांच्या परीक्षेला ९७ विद्यार्थी बसले होते. यामध्ये मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ रूरल स्टडीज, मास्टर ऑफ सायन्स या विषयांचा समावेश आहे. तर आतापर्यंत १२२ विषयांचे निकाल जाहीर झाले आहेत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळातर्फे प्रसिध्द केली आहे.